# विद्यापीठात ५० टक्के उपस्थिती

## डॉ. विलास नांदवडेकर : गर्दी कमी करण्यासाठी उपाययोजना

**कोल्हापूर, ता.१९ :** कोरोना विषाणूच्या प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शिवाजी विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांची पन्नास टक्के उपस्थिती राहणार आहे. एकूण अधिकारी व कर्मचारी यांना दररोज कार्यालयात न बोलाविता त्यांना आळीपाळीने बोलावण्यात येणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

पत्रकात म्हटले आहे की, कोरोनाचा प्रसार राज्यातील कार्यालयात होऊ नये, त्याचा अधिकारी कर्मचारी यांना संसर्ग होऊ नये, याकरिता सार्वजनिक



वाहतूक व्यवस्थेतील गर्दी कमी करणे आवश्यक आहे. त्यासाठी तातडीची उपाय योजना म्हणून विभागातील महत्त्वाचे काम चालू राहण्यासाठी अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, चिफ रेक्टर, प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी सर्व अधिकारी, कर्मचारी यांना दररोज कार्यालयात आळीपाळीने उपस्थित राहण्यास सांगावे. विभागातील एकूण अधिकारी, कर्मचारी यांची संख्या पन्नास टक्के राहील, याची दक्षता घेण्यात येत आहे. उपस्थितीचा अहवाल आस्थापना विभागास ३१ मार्च २०२० नंतर सादर करावा. या कालावधीत फक्त अत्यावश्यक सेवेकडील एकत्रित मानधन/रोजंदारी कर्मचारी उपस्थित राहतील. ज्या सेवकांची तातडीची आवश्यकता असेल, त्यांना उपस्थित राहण्याबाबतच्या सूचना द्याव्यात. ज्या अधिकारी, कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळेल, त्यांनी त्यांची प्रलंबित कामे कार्यालयातील उपस्थितीच्या दिवशी पूर्ण करावीत.



शिवाजी विद्यापीठ : बास्केटबॉल बोर्ड.



शिवाजी विद्यापीठ : व्यायामशाळेतील साहित्य.



शिवाजी विद्यापीठ : ज्यूदो, तायक्वाँदो, कुस्ती आदी खेळांचे मॅट.

# अत्याधुनिक साहित्याने क्रीडा विभाग सुसज्ज

## एक कोटी ५३ लाख रुपयांची खरेदी ; विभागात मनुष्यबळाची वानवा

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागात एक कोटी ५३ लाख रुपयांचे क्रीडा साहित्य खरेदी करण्यात आले आहे. सात वेळा निविदा काढण्यात आल्यानंतर पाच वर्षांत चार टप्प्यांत साहित्याची खरेदी झाली आहे. नामांकित कंपन्यांचे अत्याधुनिक महागडे क्रीडा साहित्य उपलब्ध झाल्याने क्रीडा शिबिरात ते वापरण्याची संधी खेळाडूंना मिळणार आहे.**

क्रीडा विभागाची विद्यापीठाचा उपेक्षित घटक म्हणून ओळख आकाराला आली आहे. विभागातील कमी मनुष्यबळामुळे क्रीडा विभागाचा डोलारा सांभाळणे अवघड झाले आहे. डॉ. पी. टी. गायकवाड प्रभारी संचालकाचा भार वाहत आहेत. कायमस्वरूपी संचालक पद भरण्याची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. प्रशासन त्यासाठी किती वेळ घेणार, हे समजत नाही.

खेळाडूंना येणाऱ्या अडचणी सोडवताना क्रीडा विभागाची त्रेधातिरपीट उडते. खेळाडूंच्या सरावासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध नसल्याने कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी रुसामधून १ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद केली. साहित्याच्या खरेदीत तीन लाख रुपये जादा झाल्याने ते विद्यापीठाच्या फंडातून देण्यात आले.

गुणवत्तेची हमी देणारे साहित्य खरेदी करण्यात आले आहे. सहा सायकल, बॉक्सिंग रिंग, कबड्डी मॅट, बास्केटबॉल पोल, तायक्वांदो, ज्युदो व कुस्तीचे मॅट, तलवारबाजीचे साहित्य प्रथमच खरेदी केले गेले. जिम, ॲथलेटिक्स, जिम्नॅस्टिक, हॉकी, टेबल टेनिस, मल्लखांब, योगा, सॉफ्टबॉल, बॉल स्टँड, खो-खोकरिता आवश्यक साहित्य घेण्यात आल्याने खेळाडूंना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेच्या सरावासाठी त्याचा फायदा उठवता येणार आहे.

### दृष्टिक्षेपात विभाग

विभागात एक संचालक, एक कायमस्वरूपी व एक रोजंदारी प्रशिक्षक, एक शिपाई, दोन क्लार्क उपलब्ध आहेत. यातील एक क्लार्क भांडारपालाचा चार्जही सांभाळतो. विभागात यापूर्वी प्रत्येकी एक डेप्युटी रजिस्ट्रार, असिस्टंट रजिस्ट्रार, सुपरिंटेंडेंट, प्रत्येकी दोन सीनिअर व ज्युनिअर क्लार्क, तीन मार्गदर्शक, नऊ शिपाई होते.

SAKAL EXCLUSIVE

> क्रीडा साहित्याने विभाग सुसज्ज झाला आहे. हे साहित्य विद्यापीठात होणाऱ्या शिबिरात खेळाडूंना सरावासाठी दिले जाते. साहित्य महागडे आहे. प्रत्येकी ४ लाख ४४ हजार ५१० रुपयांच्या दोन व प्रत्येकी ४ लाख ३९ हजार ५०७ रुपयांच्या चार सायकल विभागात आणण्यात आल्या आहेत. डिसेंबर २०१९मध्ये हेवी रोलर इलेक्ट्रिक खरेदी केला आहे. साहित्य सांभाळण्याची जोखीम मोठी आहे.
> – डॉ. पी. टी. गायकवाड, प्रभारी संचालक,
> क्रीडा अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ



| खरेदी केलेले निवडक साहित्य | रक्कम |
|---|---|
| सायकल | २६ लाख ४७ हजार ४८ (सहा) |
| आर्चरी कंपाऊंड बो | ३ लाख ६५ हजार |
| बॉक्सिंग रिंग | ६ लाख ३५ हजार |
| कबड्डी मॅट | ४ लाख ६२ हजार (२ सेट) |
| वेटलिफ्टिंग डायस | १ लाख ५ हजार ५०० |
| ट्रॅक कार्बिंग | ४ लाख ६९ हजार |
| डिस्क व हॅमर थ्रो केज | ८ लाख ४९ हजार |
| कुस्ती मॅट कव्हर | १९ हजार |
| कुस्ती मॅट | ३ लाख ४५ हजार |
| मल्टी जिम १२ स्टेशन | ३ लाख ४५ हजार |
| ट्रेड मिल | १ लाख ४० हजार |
| बास्केटबॉल बोर्ड, पोस्ट रिंग विथ | ३ लाख १० हजार |
| ग्रास कटिंग मशिन | ८१ हजार ४०० (दोन सेट) |
| हेव्ही रोलर इलेक्ट्रिक | १३ लाख ८० हजार |
| विहिल ब्रश मुव्हर | ८८ हजार २०० |
| ज्यूदो मॅट | १ लाख ४० हजार |
| तायक्वाँदो मॅट | १ लाख ४० हजार ६२५ |
| बॅडमिंटन ६ मि.मी. रबर फ्लोरिंग | २ लाख ७० हजार |
| क्रिकेट बॉलिंग मशिन | ५ लाख २७ हजार ४०० |